रिंगोची हुशारी

लेखक: **अँड्र्यू क्लेमेंट्स**

चित्रे व सजावट: **एलेन बायर**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



रिंगोची हुशारी

लेखक: **अँड्र्यू क्लेमेंट्स**

चित्रे व सजावट: **एलेन बायर**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



एक दिवस कॅरोल आपल्या
आईला भेटायला

शुश्रुषागृहात गेली होती.

तिथल्या वनात तिला एक
मांजर दिसले.



या मांजराला घर नव्हते.

आणि त्याची शेपूटही

फारच लहान होती.



पॉल देखील शुश्रुषागृहात राहत असे.

तो या मांजराला खायला देत असे.

तो कॅरोलला म्हणाला,

“आपण या मांजराला ‘मिट्झी’ असं नाव देऊया.”



मिट्झी आता लठ्ठ दिसू लागली होती.

तिला आता पिल्ले होणार होती.

कॅरोल मिट्झीसाठी खाऊ आणत असे.

त्यामुळे मिट्झीच्या पोटातील पिल्लांना

चांगले पोषण मिळत असे.

एक दिवस मिट्झी कुठेच दिसेना.

ती अंगणात नव्हती.

आणि वनात देखील नव्हती.

मग पॉलला ती दिसली.

तिला चार पिल्ले झाली होती.

कॅरोलला त्यातील लहानसे

केशरी रंगाचे पिल्लू हवे होते.

ते पाहून तिला एखाद्या

लहानशा लाल भोपळ्याची आठवण यायची.

पण कॅरोल आणि तिचा नवरा रे

यांच्याकडे अगोदरच तीन मांजरे होती.

ती म्हणाली,

“आता आणखी एक नको.”

पण शुश्रुषागृहात

एक मोठा कुत्रा राहत असे.

त्या कुत्र्याला मांजरे मुळीच आवडत नव्हती.

मिट्झी आणि तिच्या पिल्लांना

आता दुसरीकडे रहायला जाणे भाग होते.

कॅरोल म्हणाली,

“आपण या केशरी पिल्लाला घरी नेऊया.”



आणि ते त्याला घरी घेऊन गेले.

हे नवे पिल्लू हुशार होते.

त्याला बाहेर जायचे असले की

ते दारावर ठक-ठक, ठक-ठक असा
आवाज करायचे.

तो आवाज एखाद्या ढोलक्या सारखा
असायचा.

कॅरोलने त्याला नाव दिले 'रिंगो'.

हळू... हळू ...

रिंगो

मोठा होत गेला.

एकदा कॅरोल आणि रे

दोघेही खूप आजारी पडले.



त्यांना सारखी झोप येऊ लागली.

एक दिवस रिंगो दारावर उड्या मारू लागला.

ठक, ठक ठक!

तो थांबेचना.

अखेर कॅरोलने उठून त्याला दार उघडून दिले.

रिंगो बाहेर गेला.

“म्यांव! म्यांव!”

रिंगो कॅरोलला बाहेर बोलावत होता.

कॅरोल बाहेर गेल्यावर,

रिंगो चालू लागला.

तो मध्येच थांबला.

“म्यांव! म्यांव!”

रिंगोला कॅरोल त्याच्यामागे
यायला हवी होती.

रिंगो तिला घराभोवती

घेऊन गेला.

तिथल्या काही दगडांच्या आसपास

त्याने खणायला सुरुवात केली.

यापूर्वी त्याने असे कधीच केले नव्हते.

थोड्या वेळाने रिंगोचे खणणे थांबले.

“म्यांव! म्यांव!”

तो परत कॅरोलला बोलावत होता.



कॅरोल दगडांपाशी गेली.

मग रिंगो का खणत होता

ते तिच्या लक्षात आले.

कॅरोलला गॅसचा वास येऊ लागला.

हा गॅस खूपच धोक्याचा होता.

त्याचा एकदम स्फोट होऊ शकला असता.

कॅरोल घरात गेली.

तिने लोकांना मदतीला बोलावले.

काही लोक लगेच आले.

रिंगो ज्या ठिकाणी खणत होता,

त्याच ठिकाणी त्यांनीही खणायला सुरुवात केली.

गॅसचा एक नळ तुटला आहे असे त्यांना दिसले.

एकजण म्हणाला,

“हे तुमच्या लक्षात आले हे फार बरे झाले.”

या गॅसमुळेच कॅरोल आणि रे

आजारी पडले होते.

स्फोट होऊन त्यांचे घर

जळूनही गेले असते.

रिंगोने त्यांना वाचवले होते.

कॅरोल म्हणाली, “हे मला नाही समजले.

रिंगोने शोधून काढले!”

कॅरोल आणि रे दोघांनीही

लोकांना रिंगोच्या हुशारीची गोष्ट सांगितली.

रिंगो आता हिरो झाला होता.

तो टेलिव्हिजनवरही आला होता.

एका श्रीमंत माणसाला रिंगोची गोष्ट समजली.

त्यांनी कॅरोलला फोन केला.

ते म्हणाले, “तुम्ही रिंगो मला विकत द्याल का?

मी तुम्हाला हवे तेवढे पैसे देईन.”

कॅरोलने त्यांना उत्तर दिले,

“आम्ही रिंगो कधीच विकणार नाही

तो आमच्या कुटुंबातील एक सदस्य आहे!”

समाप्त